# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः23.06.2025** **वारःसोमवार**

---

1. इराण आणि इस्त्रायलमधील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची इराणच्या राष्ट्राध्यक्षांशी चर्चा
2. तेलवाहतूकीसाठी वापरांत येणारी होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा इराण संसदेत प्रस्ताव मंजूर
3. भारताकडे पुरेसा तेलसाठा असल्याचं हरदिपसिंगपुरी यांचा विश्वास आणि
4. पॅरा बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय खेळाडूंची 27 पदकांची कमाई

**<u>पंतप्रधान</u>**

इराण आणि इस्त्रायलमधील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्याशी संवाद साधला. या भागात अलिकडच्या काळात वाढलेल्या तणावाबद्दल त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. अशी माहिती समाजमाध्यमावरील संदेशांत पंतप्रधानांनी दिली आहे. तणाव कमी करण्यासाठी, संवाद आणि राजनयिक तत्वांचा वापर करावा प्रादेशिक शांतता, सुरक्षा आणि स्थिरतेसाठी प्रयत्न करण्याचं आवाहन मोदींनी यावेळी केलं.

सध्याच्या परिस्थितीबद्दल राष्ट्रपती पेझेश्कियान यांनी पंतप्रधानांना सविस्तर माहिती दिली आणि या प्रदेशातील सध्याच्या परिस्थितीबद्दल इराणचा दृष्टिकोन मांडला. भारतीय समुदायाच्या नागरिकांना सुरक्षित परतण्यासाठी पाठिंबा दिल्याबद्दल पंतप्रधानांनी पेझेश्कियान यांचे आभार मानले. व्यापार आणि आर्थिक सहकार्य, विज्ञान आणि तंत्रज्ञान तसंच दोनही देशाचील नागरिकांमधील संबंध यासह विविध क्षेत्रात द्विपक्षीय सहकार्य मजबूत करण्यासाठी काम करत राहण्याची वचनबद्धता दोन्ही नेत्यांनी या चर्चेदरम्यान पुन्हा व्यक्त केली.

**<u>इराण-संसद</u>**

इराणच्या संसदेने फोर्डो, नटान्झ आणि इस्फहान इथल्या इराणी अणु आस्थापनांवर अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर जगातील सर्वात महत्त्वाचा तेल आणि वायू वाहतूक मार्ग असलेल्या होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा प्रस्ताव एकमताने मंजूर केला आहे. या मार्गावरील सागरी वाहतुक बंद करण्याच्या अंतिम निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा अंतिम अधिकार इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेकडे आहे. या परिषदेनं अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केली नसली तरी या निर्णयामुळे जागतिक स्तरावर आर्थिक संकट निर्माण होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे.

अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी इराणच्या या निर्णयाचा 'आर्थिक आत्महत्या' असा उल्लेख करत निषेध केला आहे. ही सामुद्रधुनी बंद केल्यास इराणला तीव्र लष्करी कारवाईला सामोरे जावे लागेल असा इशारा रुबिओ यांनी दिला आहे. त्यांनी चीनला ही कारवाई रोखण्यासाठी तेहरानवर दबाव आणण्याचं आवाहन केलं आहे. दरम्यान, अमेरिकन लष्करी अधिकाऱ्यांनी संपूर्ण प्रदेशातील सैन्याला अतिदक्षतेचा इशारा दिला आहे.

**युएन बैठक**

इराणवर अमेरिकेनं काल केलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्राच्या न्यू यॉर्कमधील मुख्यालयात सुरक्षा परिषदेचं आपत्कालीन विशेष सत्र काल पार पडलं. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी या भागातील शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करण्यासंदर्भात भावनिक आवाहन केलं आहे. इराणमधील अणु प्रकल्पांवर अमेरिकेच्या लष्करी हल्ल्यांनंतर इराणमधील संकट कमी करण्यासाठी त्वरित कारवाई करण्यासाठीही त्यांनी आवाहन केलं. संबंधित देशांनी एकमेकांमधील संघर्ष त्वरित थांबबाबा आणि शांततेसाठी प्रयत्न करावेत. आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्था अर्थात IAEAच्या निरीक्षकांनी इराण अणुकार्यक्रमासाठी "विश्वसनीय, व्यापक आणि पडताळणीयोग्य उपाय" शोधण्यासाठी प्रयत्न करावेत असंही त्यांनी आवाहन केलं.

रशिया, चीन आणि पाकिस्तानने सुरक्षा परिषदेची आपत्कालीन बैठक बोलावून तात्काळ आणि बिनशर्त युद्धबंदीची मागणी करणारा ठराव मांडला. तेहरानला अमेरिकेनं केलेल्या आक्रमणाविरुद्ध स्वतःचं रक्षण करण्याचा अधिकार आहे. असं या परिषदेतील इराणचे प्रतिनिधी अमीर सईद इरावनी यांनी आपली भुमिका मांडताना सांगितलं. अमेरिकेच्या हल्ल्यांमुळे जग अधिक सुरक्षित झाले आहे, त्यामुळे निषेधाचा ठराव आपण नाकारत असल्याचं इस्रायलचे संयुक्त राष्ट्रातील राजदूत डॅनन यांनी सागितलं. तर चीनचे राजदूत फू काँग यांनी अमेरिकेच्या हल्ल्यांचा निषेध केला आणि संबंधित देशांनी संयम बाळगावा असं आवाहन केलं.

**हरदिपसिंग पुरी**

भारताकडे तेलाचा पुरेसा साठा उपलब्ध असून गेल्या दोन आठवड्यातील पश्चिम आशियाई भागातील भुराजकीय परिस्थितीकडे भारत सरकार बारकाईनं लक्ष ठेवून आहे. असं केंद्रिय पेट्रोलिअम मंत्री हरदिपसिंग पुरी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आलेल्या निर्णयांमुळे भारताने गेल्या काही वर्षांत आपल्या कच्च्या तेल आयाती संदर्भातील पुरवठा साखळीत विविधता आणली आहे आणि आता मोठ्या प्रमाणात पुरवठा होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होत नाही. त्यामुळे या परिस्थितीचा परिणाम काही प्रमाणात कमी करण्यास मदत होईल. तसंच भारतीय तेल विपणन कंपन्यांकडे अनेक आठवडे पुरेल एवढा तेल साठा उपलब्ध आहे. भारतीय नागरिकांना इंधनाचा पुरवठा स्थिर राहावा यासाठी सरकार सर्व आवश्यक पावले उचलत आहे. अशी माहिती त्यांनी या संदेशात दिली आहे.

**पीआयबी**

ऑपरेशन मिडनाईट हॅमर दरम्यान इराणविरुद्ध विमानांच्या वाहतुकीसाठी अमेरिकेने भारतीय हवाई क्षेत्राचा वापर केला होता, अशा प्रकारची चुकीची माहिती अनेक समाजमाध्यमावरील संदेशात दिली जात आहे. हे दावे चुकीचे असल्याची माहिती पत्र सुचना कार्यालयानं अशा संदेशांची पडताळणी केल्यानंतर दिली आहे. अमेरिकेच्या जॉइंट

चीफ ऑफ स्टाफचे अध्यक्ष जनरल डॅन केन यांनी नुकतीच अमेरिकन विमानांनी वापरलेल्या मार्गांची माहिती पत्रकार परिषदेत दिली होती. त्यानंतर गैरसमज पसरवण्यासाठी असा खोटा संदेश समाजमाध्यमावर प्रसारित करण्यात आला.

**<u>ऑपरेशन-सिंधू</u>**

ऑपरेशन सिंधू अंतर्गत इराणच्या मशहाद इथून विशेष विमानाने काल रात्री नवी दिल्लीत आलेल्या 285 भारतीय नागरिकांच्या गटाचे परराष्ट्रव्यवहार राज्यमंत्री पबित्रा मार्गेरिटा यांनी स्वागत केलं. या अभियानाअंतर्गत आतापर्यंत एक हजार713 भारतीय नागरिकांना इराणमधून मायदेशी आणण्यात आलं आहे. पुढील दोन दिवसांत इराणमधून आणखी 2 ते 3 उड्डाणं नियोजित आहेत. परराष्ट्र मंत्रालय इराण आणि इस्रायलमध्ये राहणाऱ्या सर्व भारतीय नागरिकांशी सतत संपर्कात असल्याचं मार्गेरिटा यांनी सांगितलं. इराणमधील भारतीय नागरिकांना तेहरानमधील भारतीय दूतावासाच्या आपत्कालीन मदतक्रमाकाद्वारे आणि नवी दिल्लीतील परराष्ट्र मंत्रालयाने स्थापन केलेल्या चोवीस तास सुरु असलेल्या नियंत्रण कक्षाच्या संपर्कात राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

**<u>शेअर बाजार</u>**

इराण-इस्रायल भू-राजकीय तणावामुळे आज अमेरिका आणि आशियातील शेअर बाजार पहिल्या सत्रात घसरले आहेत. दरम्यान, इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची आज चर्चेसाठी रशियातील मॉस्को इथं पोहोचले आहेत. अमेरिकेने केलेल्या लष्करी आक्रमणानंतर प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींबाबत ते रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करण्याची शक्यता आहे.

**<u>मतमोजणी</u>**

पाच राज्यात झालेल्या विधानसभेच्या पोटनिवडणूकीसाठीची मतमोजणी आज होणार आहे. गुजरातमधील विसावदार आणि काडी, केरळमधील निलंबुर, पश्चिम बंगालमधील कालिगाणी आणि पंजाबमधील लुधियाणा मतदारसंघांचा समावेश आहे.

**<u>राष्ट्रपती-पुस्तक प्रकाशन</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या भाषणांवर आधारित 'विंग्ज टू अवर होप्स-खंड 2' या पुस्तकाचं प्रकाशन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत होणार आहे. हे पुस्तक 51 भाषणांचं संकलन असून त्याचे खंड हिंदी आणि इंग्रजी भाषेसह ई-आवृत्तीत प्रकाशित करण्यात येणार आहेत. हे पुस्तक राष्ट्रपती भवनाच्या वतीनं संकलित आणि प्रकाशन विभागाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलं आहे.

**<u>अमित शहा</u>**

पुढील वर्षी 31 मार्चपर्यंत भारत नक्षलवादापासून मुक्त होईल, असा पुनरुच्चार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला. त्यांच्या अध्यक्षतेखाली काल संध्याकाळी रायपूर इथं नक्षलवादाचा मुकाबला करण्याबाबत आढावा बैठक झाली. या बैठकीत छत्तीसगड, आंध्र प्रदेश, तेलंगणा, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, झारखंड आणि ओडिशा या सात राज्यांचे पोलिस महासंचालक, अतिरिक्त पोलिस महासंचालक आणि वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते.

**क्रिकेट**

अँडर्सन -तेंडुलकर ट्रॉफीच्या लीड्स इथं सुरू असलेल्या पहिल्या कसोटीच्या तिसऱ्या दिवशी भारतानं 96 धावांची आघाडी घेतली आहे. पावसामुळे वेळ कमी केलेल्या या सामन्यात भारतानं दुसऱ्या डावात 2 गडी बाद 90 धावा केल्या. के एल राहुल 47 आणि कर्णधार शुभमन गिल 6 धावांवर खेळत होते. इंग्लंडचा पहिला डाव 465 धावांवर संपल्यावर भारतानं पाहिल्या डावात 471 धावा केल्या. शुभमन गिलनं 147 धावा तर ऋषभ पंत नं 134 धावा केल्या. भारतानं दुसऱ्या डावात 3 बाद 359 धावांवरून आपला खेळ सुरू केला.

**पॅरा-बॅडमिंटन**

थायलंडमध्ये पार पडलेल्या दिव्यांगांसाठीच्या पॅरा बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी 27 पदकांची कमाई केली आहे. यामध्ये 4 सुवर्ण, 10 रौप्य आणि 13 कास्य पदकांचा समावेश आहे. पदक विजेत्यांमध्ये पॅरिस पॅरालिम्पिक पदक विजेते क्रिडापटू नितेश कुमार, थुलासिमथी मुरुगेसन आणि मनीषा रामदास यांचा समावेश आहे.

**हवामान**

गुजरात आणि मध्यप्रदेशमध्ये मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. महाराष्ट्रातही येत्या 24 तासात रायगड, रत्नागिरी जिल्ह्यात आणि पुणे घाट परिसरात मुसळधार पाऊस पडेल. तर कोकण किनारपट्टीवर उंच लाटांचा इशारा देण्यात आला असून लहान होड्यांना समुद्रात न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

## नमस्कार